# उल्हासनगर महानगरपालिका

**मालमत्ता कर विभाग**

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर- ४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104


जा. क्र. उमपा/कर विभाग/ 25.9/E9/23

दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३

विषय---महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या शासकीय भुखंडावर खोटया कागदपत्राद्वारे नावे करपावती (हाऊस टॅक्स) लावल्याबाबत.

संदर्भ---श्री योगीराज देशमुख, विभाग अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-४२१ ००१ यांचेकडील दिनांक ०३/०८/२०२३ रोजीचे पत्र टोकन नं. ४१२०२३०००१३४५८

## प्रस्तावना

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०२०६०७७०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| मालमत्ता क्रमांक | कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर निर्धारण वर्ष | बांधकाम प्रकार | वापर | क्षेत्रफळ चौ.फुट |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३एओ०२०६०७७०० | धारक (व्होल्डर) | कमला नेहरु धोबीघाट, उल्हासनगर-१ | २०-फेब्रुवारी-१३<br>२०-फेब्रुवारी-१३ | पत्रेविटा<br>मोकळी जागा | निवासी<br>निवासी | ५५००<br>४५०० |

श्री योगीराज देशमुख यांनी संदर्भिय अर्जान्वये महाराष्ट्र शासनाचा भुखंड क्र ३५/१/१ कमला नेहरु धोबीघाट उल्हासनगर-१ या ठिकाणी असलेल्या शासकीय भुखंडावर अतिक्रमण करुन खोटया दस्ताऐवजाच्या आधारे कर पावती बनविण्यात आलेली असल्यामुळे ती रदद करणेबाबत कळविले आहे

श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरील जागा शासनाचे मालकीची असल्याचे दिसुन आले आहे

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीकरीता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोद आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात फक्त मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०२०६०७७०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन महाराष्ट्र शासन अशी नोंद वर्ष २०२३-२०२४ पासुन करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०२०६०७७०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन महाराष्ट्र शासन अशी नोंद वर्ष २०२३-२०२४ पासुन करावी

09/08/23

(प्रियंका राजपूत)

उप आयुक्त (कर)

उल्हासनगर महानगरपालिका

प्रत-

Scanned with CamScanner